रे.के.नं. १९०/२०२२
नि.क्र. ५४/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १२ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | राजेंद्र लक्ष्मण बर्गे |
| वय | - | ५३ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी बक्कल नं. ७१८ महामार्ग सुरक्षा पथक |
| राहणार | - | पळस्पे |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पवार यांच्यामार्फत...**

१. घटनेच्या वेळी मी मोरा पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदारपदावर कार्यरत होतो. घटना ही दि. १७/११/२०२० रोजी घडली होती. त्या दिवशी माझेकडे सकाळी ९.०० ते रात्री ९.०० या कालावधीसाठी ठाणे अंमलदार म्हणून कार्यभार होता. त्या दिवशी सकाळी गणेश बाबूराव अधिकारी या व्यक्तीने येऊन मांगीरदेवी झोपडपट्टी येथे एका इसमाने मोटार सायकल जाळल्याबाबत फिर्याद दिली. तेथे ८ मोटार सायकल रात्री १.३० ते ३.३० च्या सुमारास जाळल्या होत्या. मी त्या व्यक्तीचा सविस्तर जबाब नोंद करुन फिर्याद लिहून घेतली. त्या नुसार १२.३० च्या सुमारास गुन्हयाची नोंद केली. आता मला निशाणी क्र. १५ वरील फिर्याद दाखविली. त्यावर फिर्यादी सही आहे. तसेच समक्ष म्हणून माझी सही असून त्यातील मजकूर मी फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नमुद केलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास एपीआय श्री. देशमुख यांच्याकडे सोपविला होता.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. योगेश गांगण यांच्यामार्फत...**

हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे पोलीस ठाण्यापासून अर्धा किमी. अंतरावर आहे. फिर्याद दाखल करतेवेळी जळालेल्या आठही गाडयांचे मालक हजर

होते. घटनेनंतर गाडया विझवून त्यांचे कागदपत्रे मिळविण्यासाठी सदर गाडया मालकांना वेळ झाल्याने त्यांनी फिर्याद घटनेनंतर अंदाजे ८ तासांनी दिली. हे म्हणणे खरे नाही की, आठ वाहन मालकांपैकी गणेश याला फिर्याद देण्यास मी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी गणेश याने माझ्या सांगण्यावरून फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा सांगितला आहे.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

**(एस.पी.वानखडे)**
**न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण**
**(कोर्ट नं. २)**

**उरण,**
**दिनांक – २३/०२/२०२६**